तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय अभियांत्रिकी, (पदवी, पदव्युत्तर पदवी), शासकीय औषधनिर्माणशास्त्र (पदवी, पदव्युत्तर पदवी, फार्म-डी), अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी (पदवी), अशासकीय अनुदानित वास्तुशास्त्र (पदवी) महाविद्यालयातील पदांच्या आकृतीबंधास मान्यता देणेबाबत....

# महाराष्ट्र शासन

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१११११/(१८०/१९)/तांशि-२,**
**हुतात्मा राजगुरू चौक, मादाम काम रोड,**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : ०७ डिसेंबर, २०१९**

<u>संदर्भ</u> :- १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक टिईडी-८००१/(३२१/०१-भाग-३)/तांशि-५, दिनांक ०१ एप्रिल, २००४

२) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक पदनि२०१६/प्र.क्र.८/१६/विसु-१, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६

३) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.३०/२०१६/आपुक, दिनांक २५ मे, २०१७

४) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक पदनि ०६१७/प्र.क्र.२०/आपुक, दिनांक २९ जुन, २०१७

५) उच्च शिक्षण विभाग, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे क्रमांक F.९-९/२०१९-U II, दिनांक १७ मे, २०१९ चे पत्र.

६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी सचिव, उच्च शिक्षण विभाग, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार यांना लिहीलेले क्रमांक D.O. Misc. - २०१९/CR-७०/EST.II, दिनांक १६ जुलै, २०१९ चे पत्र.

७) वित्त विभाग उपसमितीच्या दिनांक १६ जुलै, २०१९ झालेल्या बैठकीचे इतिवृत्त क्रमांक पदनि-२०१९/प्र.क्र.५८/आपुक, दिनांक ३०जुलै, २०१९

८) वित्त विभाग उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनाक २९ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र.पदनि-२०१९/प्र.क्र.६५/१९/आपुक, दि.०९ सप्टेंबर, २०१९.

९) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१११११/(१८०/१९)/तांशि-२ दिनांक १८ सप्टेंबर, २०१९

१०) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांचे क्रमांक ५/तंशिस/पदांचा आढावा/२०१९/३९६, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१९

११) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांचे क्रमांक ५/तंशिस/पदांचा आढावा/२०१९/४३९-४४१, दिनांक ०३ डिसेंबर, २०१९

**प्रस्तावना :-**

राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीत कार्यरत असलेल्या विविध प्रशासकीय कार्यालये तथा शासकीय व अशासकीय अनुदानित शैक्षणिक संस्थांतील पदांचा आढावा संदर्भ क्रमांक १ येथे नमूद शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. संदर्भ क्रमांक २ येथे नमूद वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये सर्व प्रशासकीय विभागांनी संबंधीत विभागातील व त्यांच्या अखत्यारीतील विभागीय कार्यालयातील मंजूर पदांचा आढ़ावा घेऊन सुधारित आकतीबंध मंजूर करून घेणे अनिवार्य केलेले आहे.

संदर्भ क्रमांक ३ येथे नमुद शासन निर्णयान्वये, जे प्रशासकीय विभाग अंतिम आकृतिबंध मंजूर करून घेणार नाहीत तो पर्यंत त्या विभागांना नवीन पदनिर्मिती तसेच पदभरति करता येणार नाही, तसेच, तोपर्यंत पदे रुपांतरीत करण्यासही अनुमती देण्यात येणार नाही असे निर्देश दिलेले आहेत. या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थांतील रिक्त शिक्षकीय पदे भरण्यात आलेली नाहीत. संदर्भ क्रमांक ४ येथे नमूद शासन निर्णयान्वये, प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील मंजूर पदांचा आकृतीबंध निश्चित करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने त्यांच्या संदर्भ क्रमांक ५ येथे नमूद दिनांक १७.०५.२०१९ च्या पत्रान्वये राज्य शासनाच्या अखत्यारितील शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय पदांच्या १००% पदभरतीच्या अनुषंगाने कृती आराखडा (१००% Day action Plan) तयार करून तो त्वरीत केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयास पाठविण्याबाबत कळविलेले आहे. त्याअनुषंगाने, संदर्भ क्रमांक ६ येथील पत्रान्वये, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी राज्यातील उच्च शिक्षण संस्थांतील रिक्त पदांच्या भरतीच्या अनुषंगाने करण्यात येणा-या कार्यवाही बाबत केंद्र शासनास अवगत केलेले आहे.

वित्त विभागाने संदर्भ क्रमांक २ ते ४ येथे नमूद विविध शासन निर्णयान्वये दिलेल्या आदेशांनुसार पदनिर्मिती व पदभरती करण्यापूर्वी मंजूर पदांचा सुधारित आकृतीबंध निश्चित करणे आवश्यक होते. त्यानुसार, राज्यातील तंत्रशिक्षणाशी संबंधीत संस्थांमधील रिक्त पदे भरण्यास व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या सन २०१९-२० च्या निकषानुसार नव्याने पदे निर्माण करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव, नवीन पदनिर्मिती/पदांचे पुनरुज्जीवन व पदांचे आढावे इत्यादी प्रस्तावांची सखोल तपासणी करून शिफारशी करण्यासाठी तसेच काल्पनिक पदे निर्माण करण्यास व रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्याकरिता गठीत केलेल्या उपसमितीच्या दिनांक १६ जुलै, २०१९ रोजी झालेल्या सन २०१९ मधील चौदाव्या बैठकीसमोर ठेवण्यात आला होता. सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला होता :

*"उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त शासकिय, अशासकिय अनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापिठातील शिक्षकिय पदांच्या आकृतीबंधाचा प्रस्ताव उपसमितीच्या विचारार्थ सादर करण्यात आला होता. उपसमितीने AICTE च्या सन २०१९ च्या निकषानुसार सुधारित आकृतीबंध निश्चित करणे, काही पदे रद्द करणे व काही नविन पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समिती समोर सादर करण्याची शिफारस केली. तसेच सध्या मंजूर पदांपैकी रिक्त असलेली शिक्षकिय पदे भरण्यास उपसमितीने मान्यता दिली आहे. नव्याने निर्माण करण्याचे प्रस्तावित असलेली पदे उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेनंतरच भरता येतील."*

त्यानुसार, राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी महाविद्यालये, अशासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी महाविद्यालय, अशासकीय वास्तुशास्त्र महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथील संवैधानिक पदे, पदवी व पदविका स्तरावरील पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तर समितीच्या दिनांक २९.०८.२०१९ च्या बैठकीमध्ये मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदरच्या बैठकीचे इतिवृत्त संदर्भ क्रमांक ८ येथील पत्रान्वये निर्गमित करण्यात आले असून उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली असणा-या संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या निर्मितीस, सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली आहे.

उच्च स्तर सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार, संदर्भ क्रमांक ९ येथील शासन निर्णयानुसार तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली असणा-या संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या निर्मितीस, सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार, संदर्भाधीन शासन निर्णयानुसार अंतिम करण्यात आलेल्या आकृतीबंधामध्ये नमूद पदांचा संस्थानिहाय व संबधीत संस्थेतील विषय निहाय तपशील संचालनालयाने संदर्भ क्रमांक १० व ११ येथील पत्रांन्वये शासनास सादर केलेला असून संस्थानिहाय, विषयनिहाय व पदनाम निहाय शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत विनंती केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या शासकीय अभियांत्रिकी (पदवी, पदव्युत्तर पदवी), शासकीय औषधनिर्माणशास्त्र (पदवी, पदव्युत्तर पदवी, फार्म-डी), अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी (पदवी), अशासकीय अनुदानित वास्तुशास्त्र (पदवी) महाविद्यालयांतील शिक्षकीय पदांच्या संस्थानिहाय, अभ्यासक्रम/विषयनिहाय व पदनाम निहाय आकृतीबंधास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या शासकीय अभियांत्रिकी (पदवी, पदव्युत्तर पदवी), शासकीय औषधनिर्माणशास्त्र (पदवी, पदव्युत्तर पदवी, फार्म-डी), अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी (पदवी), अशासकीय अनुदानित वास्तुशास्त्र (पदवी) संस्थांतील संदर्भ क्रमांक ९ येथे नमूद शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या संवर्गनिहाय शिक्षकीय पदांच्या आढाव्यानुसार, तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या सन २०१९-२० साठीच्या मान्यता प्रक्रिया पुस्तिका (Approval Process Handbook) मध्ये नमुद केलेल्या कार्यभारानुसार आणि संबंधीत संस्थांनी वाटप करून दिलेल्या नुसार संस्थानिहाय, अभ्यासक्रम/विषय निहाय आणि पदनाम निहाय पदांच्या आकृतीबंधास सोबत जोडलेल्या प्रपत्रामधील रकाना क्रमांक ०८ नुसार मान्यता देण्यात येत आहे.

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या सन २०१९-२० साठीच्या मान्यता प्रक्रिया पुस्तिका (Approval Process Handbook) मध्ये नमुद केलेल्या कार्यभारानुसार आणि संबंधीत संस्थांनी केलेल्या शिफारशीनुसार सोबत जोडलेल्या प्रपत्रामधील रकाना क्रमांक ०७ मध्ये नमूद पदे व्यपगत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली असणा-या संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या निर्मितीस, सुधारित आढाव्यास उच्च स्तर सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार आणि संवर्ग निहाय अंतिम करण्यात आलेल्या आढाव्यानुसार नमूद पदसंख्येच्या मर्यादेत संस्थानिहाय, अभ्यासक्रम/विषय निहाय आणि पदनाम निहाय स्तंभ क्र. ८ मध्ये नमूद पदांच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात येत आहे.

४. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक : ४५६/आपुक, दि. १३/०९/२०१९ व क्रमांक ३७१/२०१९/सेवा-९, दिनांक १६/०९/२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९१२०७१२०२२०१३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Satish Jagdeorao Tidke

Digitally signed by Satish Jagdeorao Tidke
DN: CN = Satish Jagdeorao Tidke, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Higher And Technical Education Department
Date: 2020.01.07 11:58:41 +05'30'

**(सतीश ज. तिडके)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :-

१. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर, (संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचेमार्फत),
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ), मंबई-१/नागपूर-२,
५. महालेखापाल (लेखा परीक्षा ), मंबई-१/नागपूर-२,
६. निवासी लेखा परीक्षा, मुंबई,
७. संचालक, लेखा व कोषागार संचालनालय, मुंबई,
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, (संचालनालयामार्फत),
१०. वित्त विभाग, सेवा-९ /आपुक, मंत्रालय, मुंबई,
११. प्राचार्य/संचालक, सर्व शासकीय अभियांत्रिकी पदवी/पदव्युत्तर पदवी महाविद्यालय, (संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचेमार्फत),
१२. प्राचार्य/संचालक, सर्व अशासकीय अभियांत्रिकी पदवी महाविद्यालय, (संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचेमार्फत),
१३. प्राचार्य/संचालक, सर्व शासकीय औषधनिर्माणशास्त्र पदवी/ पदव्युत्तर पदवी महाविद्यालय, (संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचेमार्फत),
१४. प्राचार्य/संचालक, सर्व अशासकीय अनुदानित वास्तुशास्त्र महाविद्यालये, (संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचेमार्फत),
१५. उच्च व तंत्र शिक्षण विभाग/कार्यासन क्रमांक तांशि-१,३,४ मंत्रालय, मुंबई,
१६. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
१७. मा.रा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
१८. निवड नस्ती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग/तांशि-२.

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१११९/(१८०/१९)/तांशि-२, दिनांक ०७/१२/२०१९ सोबतचे प्रपत्र.

## तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय औषधनिर्माणशास्त्र (पदवी) महाविद्यालयांमधील पदांचा सुधारीत आकृतीबंध

### शासकीय औषधनिर्माण महाविद्यालय, एकत्रित

| अ क्र | पदाचे नांव व सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | सन २००४ व नंतरच्या शासन निर्णयानुसार मंजुर पदांची संख्या | दि. १८.०९.२०१९ नुसार नवीन पद निर्मिती /सर्व संस्थातर्गत (Inter Institute) अदला बदलीने पद निर्मिती | AICTE निकष विचारात घेता कार्यभारानुसार कमी करावयाची पदे | मुळ संस्थेतील पदांची अदला बदली (Intra-Inisitute) | निव्वळ व्यपगत पदे | AICTE निकषानुसार सुधारीत मंजूर आढावा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | प्राचार्य - ३७४००-६७००० AGP (१००००) | ४ | ० | ० | ० | ० | ४ |
| २ | प्राध्यापक - ३७४००-६७००० AGP (१००००) | ४ | ३ | ० | ० | ० | ७ |
| ३ | सहयोगी प्राध्यापक - ३७४००-६७००० AGP (९०००) | १४ | ० | ० | ० | ० | १४ |
| ४ | सहाय्यक प्राध्यापक -१५६००-३९१०० AGP (६०००) | ३१ | ६ | ० | ० | ० | ३७ |
|  | **एकुण (१+२+३+४)** | **५३** | **९** | **०** | **०** | **०** | **६२** |

# शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड

| अ क्र | पदाचे नांव व सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | सन २००४ व नंतरच्या शासन निर्णयानुसार मंजुर पदांची संख्या | दि. १८.०९.२०१९ नुसार नवीन पद निर्मिती /सर्व संस्थातर्गत (Inter Institute) अदला बदलीने पद निर्मिती | AICTE निकष विचारात घेता कार्यभारानुसार कमी करावयाची पदे | मुळ संस्थेतील पदांची अदला बदली (Intra-Inistitute) | निव्वळ व्यपगत पदे | AICTE निकषानुसार सुधारीत मंजूर आढावा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | प्राचार्य - ३७४००-६७००० AGP (१००००) | १ | ० | ० | ० | ० | १ |
| २ | प्राध्यापक - ३७४००-६७००० AGP (१००००) | १ | १ | ० | ० | ० | २ |
| ३ | सहयोगी प्राध्यापक - ३७४००-६७००० AGP (९०००) | ४ | ० | ० | ० | ० | ४ |
| ४ | सहाय्यक प्राध्यापक -१५६००-३९१०० AGP (६०००) | ८ | २ | ० | ० | ० | १० |
|  | **एकुण (१+२+३+४)** | **१४** | **३** | **०** | **०** | **०** | **१७** |

**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१११९/(१८०/१९)/तांशि-२, दिनांक ०७/१२/२०१९ सोबतचे प्रपत्र.**

## तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय औषधनिर्माणशास्त्र (पदव्युत्तर पदवी) महाविद्यालयांमधील पदांचा सुधारीत आकृतीबंध

## शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय (पदव्युत्तर पदवी), एकत्रित

| अ क्र | पदाचे नांव व सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | सन २००४ व नंतरच्या शासन निर्णयानुसार मंजुर पदांची संख्या | दि. १८.०९.२०१९ नुसार नवीन पद निर्मिती /सर्व संस्थातर्गत (Inter Institute) अदला बदलीने पद निर्मिती | AICTE निकष विचारात घेता कार्यभारानुसार कमी करावयाची पदे | मुळ संस्थेतील पदांची अदला बदली (Intra-Inistitute) | निव्वळ व्यपगत पदे | AICTE निकषानुसार सुधारीत मंजूर आढावा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | प्राचार्य - ३७४००-६७००० AGP (१००००) | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | प्राध्यापक - ३७४००-६७००० AGP (१००००) | ० | ६ | ० | ० | ० | ६ |
| ३ | सहयोगी प्राध्यापक - ३७४००-६७००० AGP (९०००) | ० | ६ | ० | ० | ० | ६ |
| ४ | सहाय्यक प्राध्यापक -१५६००-३९१०० AGP (६०००) | ० | ३ | ० | ० | ० | ३ |
| | **एकुण (१+२+३+४)** | **०** | **१५** | **०** | **०** | **०** | **१५** |

# शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड - पदव्युत्तर पदवी

| अ क्र | पदाचे नांव व सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | सन २००४ व नंतरच्या शासन निर्णयानुसार मंजुर पदांची संख्या | दि. १८.०९.२०१९ नुसार नवीन पद निर्मिती /सर्व संस्थातर्गत (Inter Institute) अदला बदलीने पद निर्मिती | AICTE निकष विचारात घेता कार्यभारानुसार कमी करावयाची पदे | मुळ संस्थेतील पदांची अदला बदली (Intra-Inistitute) | निव्वळ व्यपगत पदे | AICTE निकषानुसार सुधारीत मंजूर आढावा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | प्राचार्य - ३७४००-६७००० AGP (१००००) | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | प्राध्यापक - ३७४००-६७००० AGP (१००००) | ० | २ | ० | ० | ० | २ |
| ३ | सहयोगी प्राध्यापक - ३७४००-६७००० AGP (९०००) | ० | २ | ० | ० | ० | २ |
| ४ | सहाय्यक प्राध्यापक -१५६००-३९१०० AGP (६०००) | ० | १ | ० | ० | ० | १ |
| | **एकुण (१+२+३+४)** | **०** | **५** | **०** | **०** | **०** | **५** |